**नगर विकास विभाग,**

चौथा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२
दिनांक २० सप्टेंबर २०२२

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६*

***अधिसूचना***

क्रमांक टीपीएस-१८२०/१५०/प्र. क्र. ११/२०२०/लवाद/नवि-१३.--ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८१७/९७३/प्र. क्र. १०३/१७/नवि-१३, दिनांक १३ सप्टेंबर २०१७ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७) (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) च्या कलम १५१ *(१)* अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांनी उक्त अधिनियमाच्या कलम ६८ चे उप-कलम *(२)* अन्वये अधिसूचना क्रमांक विप/नरयो-२, ३, ४, ५/प्र. क्र. ६३-६६/शाखा-१/२६४१/ २०२०, दिनांक ९ जानेवारी २०२० अन्वये होळकरवाडी प्रारूप नगर रचना योजना क्रमांक ५ (यापुढे जिचा उल्लेख "उक्त प्रारूप योजना" असा केला आहे) मंजूर करण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ७२ *(१)* अन्वये उक्त प्रारूप योजना मंजूर केलेल्या व महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत लवाद यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे ;

आणि ज्याअर्थी, राज्य शासनाने अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८२०/१५०/प्र. क्र. ११/२०२०/लवाद/नवि-१३, दिनांक २३ डिसेंबर २०२१ अन्वये, श्री. र. ना. जायभाये, सहायक संचालक, नगर रचना, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांची उक्त प्रारूप योजनेसाठी तसेच इतर पाच नगर रचना योजनांसाठी लवाद म्हणून नियुक्ती केली आहे ;

आणि ज्याअर्थी, श्री. र. ना. जायभाये यांचेकडे इतर नगर रचना योजनांचे लवादीय कामकाज असून, उक्त प्रारूप योजनेचे लवादीय कामकाज शीघ्रतेने व मुदतीत करावयाचे आहे. त्यामुळे उक्त प्रारूप योजनेसाठी इतर अधिकाऱ्यांची लवाद म्हणून नियुक्ती करणे आवश्यक झाले आहे.

त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाच्या कलम ७२ चे उप-कलम *(१)* अन्वये आणि महाराष्ट्र नगर रचना योजना नियम, १९७४ मधील नियम क्रमांक ११ नुसार प्राप्त अधिकारात शासन याद्वारे श्री. र. ना. जायभाये यांचे ऐवजी श्री. मा. द. राठोड, निवृत्त सहायक संचालक, नगर रचना यांची उक्त प्रारूप योजनेसाठी लवाद म्हणून कंत्राटी पद्धतीने तात्काळ नियुक्ती करीत आहे. त्यांचे परिश्रमिक व भत्ते शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२७१५/प्र. क्र. १००/१३, दिनांक १७ डिसेंबर २०१६ नुसार राहील. तसेच लवाद यांना आवश्यक ते सर्व साहाय्य व त्यांच्यावर देण्यात आलेल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी स्वतंत्र कार्यालय व इतर अत्यावश्यक सोयीसुविधा पुरविण्याबाबत महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना याद्वारे सूचना देण्यात येत आहेत.

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,*

**किशोर वि. गोखले,**

अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

---

**URBAN DEVELOPMENT DEPARTMENT**

Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai-400 032
Dated 20th September 2022

*Maharashtra Regional and Town Planning Act, 1966*

***Notification***

No. TPS-1820/150/CR-11/2020/Arbitrator/UD-13.—Whereas, the Holkarwadi Draft Town Planning Scheme No. 5 (hereinafter referred to as "the said Draft Scheme") has been sanctioned by the Metropolitan Commissioner and Chief Executive Officer, Pune Metropolitan Region Development Authority, Pune *vide* Notification No. DP/TPS-2/2, 3, 4, 5/C.R. 63-66/Br.I/2641/2020, dated 9th January 2020,

issued under sub-section *(2)* of Section 68 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") as per the powers delegated under Section 151 *(1)* by the Government in Urban Development Department *vide* Notification No. TPS-1817/973/CR-103/17/UD-13, dated 13th September 2017 of the said Act ;

and whereas, as per the provisions of Section 72 *(1)* of the said Act, it is necessary to appoint an Arbitrator, within one month from the date on which the sanction to the said Draft Scheme is published in the Official Gazette ;

and whereas, the Government of Maharashtra has appointed Shri. R. N. Jaybhaye, Assistant Director of Town Planning, Pune Metropolitan Region Development Authority, Pune as an Arbitrator for the said Draft Scheme and other five Town Planning Schemes, *vide* it's Notification No. TPS-1820/150/ C.R.11/2020/Arbitrator/UD-13, dated 23rd December 2021 ;

and whereas, Shri. R. N. Jaybhaye has arbitration work of other Town Planning Schemes and the arbitration work of the said Draft Scheme should be done expeditiously and within time bound manner. Therefore, it has become necessary to appoint other officials as an Arbitrator for the said Draft Scheme.

Now therefore, in exercise of the powers conferred by sub-section *(1)* of Section 72 of the said Act read with Rule No. 11 of the Maharashtra Town Planning Scheme Rules, 1974, the Government of Maharashtra hereby, in place of Shri. R. N. Jaybhaye, appoints Shri. M. D. Rathod, Retired Assistant Director of Town Planning, on contractual basis, as an Arbitrator for the said Draft Scheme with immediate effect. Their salary and allowances will be as per the Government Order No. संकीर्ण-२७१५/ प्र. क्र. १००/१३, dated 17th December 2016 and further directs the Pune Metropolitan Region Development Authority, Pune to extend all reasonable assistance to the Arbitrator and also provide him with an independent office and other necessary perks to carry out duties cast upon him in the time bound manner and bear the cost on such items.

*By order and in the name of the Governor of Maharashtra,*

**KISHOR V. GOKHALE,**
Under Secretary to Government.

---

**नगर विकास विभाग,**

चौथा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२
दिनांक २० सप्टेंबर २०२२

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६*

***अधिसूचना***

क्रमांक टीपीएस-१८२०/१५०/प्र. क्र. ११/२०२०/लवाद/नवि-१३.--ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८१७/९७३/प्र. क्र. १०३/१७/नवि-१३, दिनांक १३ सप्टेंबर २०१७ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७) (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) च्या कलम १५१ *(१)* अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांनी उक्त अधिनियमाच्या कलम ६८ चे उप-कलम *(२)* अन्वये अधिसूचना क्रमांक विप/नरयो-१/७-२०७/प्र. क्र. ४५/शाखा-१/१३१९, दिनांक १९ सप्टेंबर २०१८ अन्वये म्हाळुंगे-माण प्रारूप नगर रचना योजना क्रमांक १ (यापुढे जिचा उल्लेख "उक्त प्रारूप योजना" असा केला आहे) मंजूर करण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ७२ *(१)* अन्वये उक्त प्रारूप योजना मंजूर केलेल्या व महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत लवाद यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे ;

आणि ज्याअर्थी, राज्य शासनाने अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८२०/१५०/प्र. क्र. ११/२०२०/लवाद/नवि-१३, दिनांक २३ डिसेंबर २०२१ अन्वये, श्री. र. ना. जायभाये, सहायक संचालक, नगर रचना, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांची उक्त प्रारूप योजनेसाठी तसेच इतर पाच नगर रचना योजनांसाठी लवाद म्हणून नियुक्ती केली आहे ;